महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : २० एप्रिल, २०१६

परिपत्रक

क्रमांक: सिआरझेड-१२१५/१०९३/प्र.क्र.४०/१५/नवि-१२

विषय :- संरक्षण विभागाचे आस्थापनांचे सभोवतालील बांधकाम कार्याचे नियंत्रणासाठी मार्गदर्शक सुचना.

संदर्भ :- शासन, नगर विकास विभागाचे परिपत्रक
१) क्र. सिआरझेड-२०१२/प्र.क्र.२/१२/नवि-१२, दि. २१/२/२०१५
२) क्र. सिआरझेड-१२१५/१०९३/प्र.क्र.४०/१५/नवि-१२, दि. ४/२/२०१६.

संरक्षण विभागाच्या आस्थापनांलगतच्या जमिनीच्या विकासासंदर्भात संरक्षण विभागाने दि. १८/५/२०११ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना, तद्नंतर स्थलसेनेने दि. ३/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेले स्पष्टीकरण आणि संरक्षण विभागाचे एका प्रकरणी दिलेले दि. १४/१/२०१३ रोजीचे पत्र विचारात घेऊन, संरक्षण विभागाच्या मार्गदर्शक तत्वांची एकसमान (uniform) अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने व त्यामध्ये सुसुत्रता राहण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने यापुर्वी दि. ४/११/२०१० च्या पत्रान्वये केवळ बृहन्मुंबई क्षेत्रापुरते निर्गमित केलेले पत्र रद्द करुन, राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे/ विशेष नियोजन प्राधिकरणे तसेच जिल्हाधिकारी यांना सर्वसमावेशक अशा मार्गदर्शक सुचना संदर्भाधिन परिपत्रक क्र. १ अन्वये शासनाने दिल्या आहेत.

केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाने दि. १८/३/२०१५ च्या पत्रान्वये व तद्नंतर दि. १७/११/२०१५ च्या पत्रान्वये त्यांचे दि. १८/५/२०११ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनामधील परिच्छेद १(बी) खाली समाविष्ट करण्यात आलेली परंतुके विचारात घेऊन, राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरण/ विशेष नियोजन प्राधिकरण तसेच जिल्हाधिकारी यांना शासनाने दि. २१/२/२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनामधील अनुक्रमांक ई नंतर अनुक्रमांक फ व ग प्रमाणेच्या मार्गदर्शक सुचना संदर्भाधीन परिपत्रक क्र. २ अन्वये दिल्या आहेत. संदर्भित

परिपत्रक क्र. २ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनील अनुक्रमांक फ व ग संदर्भात संरक्षण विभागाकडुन प्राप्त पत्रानुसार खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

i) "In line with or behind" व "by the shadow or shield of " या वाक्प्रचारांचा अर्थ संरक्षण खात्याचे हद्दीपासून ५०० मी. अंतरापर्यंतच्या असलेल्या अस्तित्वातील बांधकामाच्या रेषेत वा त्यांचे पडछायेतील बांधकामे असा घेणे अभिप्रेत आहे.

ii) स्थानिक संरक्षण प्राधिकरणास दिलेली ३० दिवसाची मुदत म्हणजे त्या प्राधिकरणाने ३० दिवसात त्यांचे अभिप्राय देणे अभिप्रेत आहेत. जर त्या कालावधीत अभिप्राय देण्यात आले नाहीत, तर स्थानिक संरक्षण प्राधिकरणाचे काही अभिप्राय नाहीत, असे समजण्यात येईल. तद्वतच स्थानिक संरक्षण प्राधिकरणाने प्रतिकुल शेरे दिल्यास त्यानुसार नियोजन प्राधिकरणाने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी तसेच इतर बाबी संदर्भाने विचारपुर्वक निर्णय (Considered Decision) घेणे आवश्यक आहे.

iii) जर विकास परवानगी दि. १८/५/२०११ नंतर दिली असल्यास स्थानिक संरक्षण प्राधिकरणांचे उपरोल्लेखित प्रकरणांमध्ये अभिप्राय प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

iv) बांधकामाची उंची स्थानिक प्राधिकरणाचे नियमानुसार अनुज्ञेय राहील.

उपरोक्त स्पष्टीकरणात्मक मार्गदर्शक सुचना तात्काळ अंमलात येतील व त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

(अविनाश पाटील)
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :-**

१) सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
त्यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना माहितीसाठी आणि आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

२) संचालक (एल अॅण्ड सी) संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

३) एयर ऑफीसर कमांडींग, एचक्यू, मेरीटाईम ,एयर ऑपरेशन, आय.ओे.एफ. बिल्डींग, महात्मा गांधी रोड, न्यू मरीन लाईन, मुंबई -४०० ०११.

४) अेव्हीएसएम, व्हीएसएम, फ्लॅग ऑफीसर कंमाडीग इन चिफ, वेस्टन नेव्हल कमांड, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई.